रत्नागिरी टाइम्स

मंगळवार, दि. १ ऑगस्ट २०२३

# हळबे महाविद्यालयात क्रिडा प्रशिक्षण कार्यशाळा

दोडामार्ग, ३१ जुलै (प्रतिनिधी) - मनुष्याला रोगांपासून दूर राहण्यासाठी निरोगी शरीर असणे आवश्यक आहे. एका निरोगी शरीरातुनच निरोगी मन व बुद्धिचा विकास होतो. शरीराला स्वस्थ ठेवण्यासाठी खेळाचे भरपूर महत्त्व आहे. खेळ खेळल्याने मनुष्यात धैर्य, सहनशीलता आणि मानवी गुणांचा विकास होतो, असे मत सिंधुदुर्ग पोलिस विभागाचे कवायत प्रशिक्षक कृष्णा जंगले यांनी व्यक्त केले.

लक्ष्मीबाई सिताराम हळबे, कला व वाणिज्य महाविद्यालयात एक दिवशीय क्रिडा प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी कृष्णा जंगले यांनी खेळांचे महत्त्व याविषयावर मार्गदर्शन केले. यावेळी व्यासपिठावर उपस्थित महाविद्यालय विकाससमीती सदस्य विवेकानंद नाईक, सिंधुदुर्ग पोलिस कवायत प्रशिक्षक कृष्णा जंगले, मातोश्री राखीताई पाटकर ॲकॅडमीचे संचालक तारा पाटकर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष सावंत, सिंधुदुर्ग पोलिस वाहन चालक कु. सोनिया नाईक, कु. कनिष्का धूरी, जिमखाना विभाग प्रमुख डॉ. संजय खडपकर, प्रा. प्रियांका गवस व इतर सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी आणि बहुसंखेने विद्यार्थी उपस्थित होते.



लक्ष्मीबाई सिताराम हळबे महाविद्यालयात मान्यवरांचा सत्कार करताना.

Scanned with ACE Scanner